म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५८३
१८८३

# प्रार्थनासंगीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें.

मुंबईत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक ५८३
लेखक
पुस्तकाचें नांव प्रार्थनासंगीत
५८३
सन १८८३

सं. काव्य ३८८
ठाणें.

Janardan B. Modak

# प्रार्थनासंगीत.

5th Aug. 1873

Ratnagiri

मुंबईत
"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

फाल्गुन वद्य ११ मंगळवार शके १७९४.
सन १८७३.

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.

पदें, धृपदें, इत्यादि.

शुद्ध प्रार्थनेचीं . . . . . . . . . . . . . . . . . . . १

नीतिपर व ध्यानास साह्यकारी . . . . . . . . . . . . . १४

साक्या . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २२

दिंड्या . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २६

अभंग.

दोन चरणी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३०

चार चरणी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ३६

श्लोक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ४७

संकाव्य- ३८८
काव्य.
९३२
मराठी ग्रंथ संग्रहालय नं. २२८

# प्रार्थनासंगीत.

## शुद्ध प्रार्थनेचीं गीतें.

१. राग अल्हया—ताल आडा.

तुझी आरति करी सकल भुवन । देखुनि निर्वृत होती नयन॥ध्रु०॥ विशाल पात्र हें गगन । त्यांत दीप अनुक्षण । शोभती शशी तपन । हृदयरंजन ॥ मुक्तामाला जैशा काय । तारकासमुदाय । किती तरी शोभा पाय । हे भवभयभंजन ॥ तुझी० ॥ १ ॥ धूप मलयपवन । निरंतर समीरण । करी चामरव्यजन । हे विश्वकारण ॥ सर्व वनें उपवनें । अर्पिती सदा सुमनें । वाजे भेरी उच्चस्वनें । ऐकिती भाविक जे जन ॥ तुझी० ॥ २ ॥

२. राग भैरवी—ताल त्रिवट.

पाव प्रभो करूणाकर तारक । धांव कृपानिधि हे भवनायक ॥ ध्रु० ॥ हे जगदीश्वर दीनजनोद्धर । हा भव दुस्तर यांतुनि उद्धर ॥ पाव० ॥ १ ॥ दुर्धर कामादिक रिपु छळिती । पाव जगत्पति सेवकहितकर ॥ पाव० ॥ २ ॥ दीनशरण भयहरण करीं त्वरें । प्रेमभरें स्तवि हा तव किंकर ॥ पाव०॥३॥

३. राग बेहाग—ताल त्रिवट.

पतितपावन दीनदयाघन करूणाकर देवा । अनन्यभावें सकलहि प्रेमें करूं तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ अधम पातकी अनाथ

आह्मी न कळे हित आपुलें । क्षणिकसुखांतें नित्य मानुनी मन विषयीं रमलें । धनमानादिक संचित करणें सार्थक हें गमलें । मोह विपिन अतिगहन यामध्यें चित्त सुचिर भ्रमलें ॥ चाल ॥ यांत कोण आमुतें तारिल प्रभु आतां । पातकनाशन दीनानाथा तूंचि मोक्षदाता । करूं नको उपेक्षा तुजविण नाहीं आह्मां त्राता ॥ कामादिक रिपुमेळा निवटुनि दाविं स्वहित ठेवा । जगदुद्धारा तव भजनाचा असो सदा हेवा ॥ पतित० ॥ १ ॥

४. राग धनाश्री—ताल त्रिवट.

दीनदयाळा तारक तूं एकचि आह्मां । देउनि भक्ति सांभाळुनि ने निजधामा ॥ ध्रु० ॥ विश्वाधारा अद्भुत हें मानुषजन्म । चिच्छक्तीचें निर्मियलें मंगलधाम । सुखसाधन या दीधला इंद्रियग्राम । परि न स्थिर हें नकळे ह्मा मजला वर्म ॥दीन०॥ १ ॥ विसरूनि तुजला गुंतलों मायाजाळीं । सार्थक न घडे व्यर्थचि या पिंडा पाळीं । गांठिल काळ न गमे मज कोणेवेळीं । तळमळ चित्ता मायबाप संकट टाळीं ॥ दीन० ॥ २ ॥ परोपकारें सार्थक हो या देहाचें । मंगलनामें गाइन मी अनुदिन वाचे । तव गुण ध्यानीं विनटो हें मानस माझें । पुरवीं सखया वांछित हें निजभक्ताचें ॥ दीन० ॥ ३ ॥

५. राग केदारा—ताल त्रिवट.

जगदुद्धारा करिं भावें प्रेमल गाना । सांडुनि वांछा ऐहिक मी या धनमाना ॥ ध्रु० ॥ निर्मियली त्वां नरतनु ही अद्भुत लीला। अंतर्यामीं रहिवास प्रेमें केला । ह्मणुनी तुझिया भजनीं रे शिशु हा रमला । मंगल ध्यानें आनंदें अनुदिन भरला ॥जगदु० ॥ १ ॥ संसाराचें व्यर्थ हें ममता जाळ । त्यागुनि साधू धुंडिती रानोमाळ । परि संसारीं राहुनियां हें तव बाळ । चरणीं होवो रत तुझिया वेळोवेळ ॥ जगदु० ॥ २ ॥

६. राग देस—ताल त्रिवट.

महिम्या तुझ्या न तुला । प्रभुजी महिम्या तुझ्या न तुला ॥ध्रु०॥
चक्षु न देखे कर्ण न ऐके। रसना न चाखे तुला ॥प्रभु०॥१॥
परि तूं देवा व्यापिशी विश्वा। दृश्य हृदीं सकलां ॥ प्रभु० ॥२॥
इंद्रिय कैंवी परिमित ग्राहक। ग्रहण करी निष्कला ॥ प्रभु०॥३॥
हृदयीं प्रकटुनी आनंदोर्मि । उठविशि तूं विमला ॥ प्रभु०॥४॥
भक्त तुझे जे प्रेमें स्तविती । भय कैंचें त्यांजला ॥ प्रभु० ॥५॥
दुस्तर या भवसागरीं नौका। तूंचि दया वत्सला ॥प्रभु०॥६॥
विषयासक्ति तुजपासुनि बा । दूरचि ने मजला॥ प्रभु० ॥ ७ ॥
ह्मणउनि दीना ओढुनि जवळीं । दावि पदा अढळा॥प्रभु०॥८॥

७. राग कल्याणी—ताल त्रिवट.

सुखाब्धि तव प्रेमाची मजला गोडी लाव । दयेनें हेलाव ॥ ध्रु० ॥ भवडोहीं आह्मातें तुझी तारक भक्तिनाव । सबळ ती तारक भक्तीनाव । दयेनें हेलाव ॥ सुखा० ॥ १ ॥ मोहादिक शत्रूंनि गांठिलें परम समर्था धांव । दयाळा परम समर्था धांव । दयेनें हेलाव ॥ सुखा० ॥ २ ॥ निर्वाणींचा परम सखा तूं सत्वर संकटीं पाव । दिनाला सत्वर संकटीं पाव । दयेनें हेलाव ॥ सुखा० ॥ ३ ॥ प्रज्ञादीपक उजळुनि स्वांतीं सद्भक्तिपथ दाव । मतिला सद्भक्तिपथ दाव । दयेनें हेलाव ॥ सुखा० ॥ ४ ॥ क्षणिक सुखीं नको लोभवूं मजला दे निजचरणीं ठाव । श्रांताला दे निजचरणीं ठाव । दयेनें हेलाव ॥ सुखा० ॥ ५ ॥ नित्य भक्तिसुखस्वादीं वेधीं शुद्ध मनाचे भाव । क्षुधित हे शुद्ध मनाचे भाव । दयेनें हेलाव ॥ सुखा० ॥ ६ ॥

८. राग काफी—ताल दीपचंद्री.

ज्यौं जानो त्यौं तारो । स्वामी मैं कुटिल कठिन खल कामी ॥ध्रु०॥ जप तप नेम शुच संजम । इनबिध नहिं छुटकार ॥ गारद घोर तूं अंधते काढो । नानक नदर न्यहाल ॥ ज्यौं जानो० ॥ १ ॥

९. राग भैरवी—ताल त्रिवट.

संतपदाची जोड । दे हरि संतपदाची जोड ॥ ध्रु० ॥ संतसमागमें आत्महिताचा । सुंदर उगवे मोड ॥ दे० ॥ १ ॥ सुफलित करुनी पूर्ण मनोरथ । पुरविशि जिविचें कोड ॥ दे० ॥ २ ॥ अमृत ह्मणे रे हरि भक्ताचा । शेवट करिशी गोड ॥ दे० ॥ ३ ॥

१०. राग जोगी—ताल एका.

माझ्या कनवाळू क्षमानिधी । दीन मी आहें साधी । मळलों दुरितमळें मज शोधी । शरण तुला अपराधी ॥ ध्रु०॥ जाणुन आदीं करितों अनुचित तें । काय असें मज होतें । नकळे हें स्वामी विश्वपते । आवरी या चित्तातें ॥ मा० ॥ १ ॥ विचार करुनी ही निश्चय । करितां स्थीर न होय । याशीं तव कृपेशीवाय । नाहीं अन्य उपाय ॥ मा० ॥ २ ॥ समर्था घेतलें तूं माझें । सर्व प्रकारें ओझें । तैसें कर भजनीं मन रीझे । आणि खेदाग्नि विझे ॥ मा० ॥ ३ ॥

११. राग काफी—ताल दीपचंदी.

तूझी ममता अनंत । हे प्रभु तूझी ममता अनंत ॥ ध्रु० ॥ दीनदयाळा हे जनपाळा । आह्मासि लागे न अंत ॥हे प्रभु०॥१॥ विस्मृति पडतां सेवा न घडतां । होतसे मानसिं खंत ॥हे प्रभु०॥२॥

सेवेंत असतां द्रव्यहि नसतां । असुं आह्मि लक्ष्मीवंत ॥ हे प्रभु० ॥३॥
अद्भुत लीला गातां दयाळा । शिणलेहि साधूसंत ॥ हे प्रभु० ॥४॥
आनंदकंदा शाश्वतसुखदा । संसार ह्याचि दुरंत ॥ हे प्रभु० ॥५॥
पातकनाशन विघ्नविभंजन । तारिं आह्मा भगवंत ॥ हे प्रभु० ॥६॥

१२. राग कानडा—ताल त्रिवट.

जगदीश्वर करुणाकर अघहर । घोर तुझ्याविण नटळे रे ॥ध्रु०॥ कोठुनि आलों कोठें जातों । पूर्णपणें मज न कळे रे ॥ क्षणिक सुखीं संतत रत होउनि । चित्त त्वत्पदीं न वळे रे ॥जग०॥१॥ षड्रिपुनीं ही ग्रासिली काया । विषयसुखांतुनि न ढळे रे ॥ त्यांतुनि सोडविं प्रेमजलें धुविं । मन्मन कीं तें न मळे रे ॥ जग०॥ २ ॥ पापविनाशन संनिध अहे । पाप अखिल कां न पळे रे ॥ भक्तिरसें जरि आर्द्र हृदय हें । तापें कधिं तें न जळे रे ॥ जग० ॥ ३ ॥

१३. राग झिंजोटी—ताल एका.

दाखविं तव दिव्य पाय प्रभो दयाधामा ॥ ध्रु० ॥ हीनदीन आस तुझी कास पूर्ण आह्मां । धरावया पाहतसें अगा कल्पद्रुमा ॥ दाख० ॥ १ ॥ मायबाप बंधु गोत्र मित्र तूंचि आह्मां । तूजवीण कोण असे हृदयाभिरामा ॥ दाख० ॥ २ ॥ आकुल मनिं भक्त

ह्मणे सख्या गुणग्रामा । शीणभाग हरीं त्वरें पुसोनियां घामा ॥ दाख० ॥ ३ ॥

१४. राग भैरवी—ताल त्रिवट.

दर मांदे ठाडे दरबार ॥ ध्रु० ॥ तुजबिन सुरत करे को मोरी । दरसन दीजे खोल कवाड ॥दर०॥१॥ तुम धन धनी उदार त्यागी । सरवन सुनियेत सुजस तुमार ॥ दर० ॥ २ ॥ मांगों काहे रंक सब देखों । तुमही ते मोरो निस्तार ॥ दर०॥ ३ ॥ कहे कबीर तुम समरथ दाते । चार पदारथ देत न बार ॥ दर० ॥ ४ ॥

१५. राग भैरवी—ताल त्रिवट.

पतितहि हा तव दास तरावा ॥ध्रु०॥ दास तरावा भवजलधि सुखें । भीति त्रास नुरावा ॥ पतितहि० ॥१॥ दे प्रभु मजला वर ऐसा कीं । जेणें ताप सरावा ॥ पतितहि० ॥ २ ॥ थोर तुझ्यासम कोण असे ज्या । दीनें आ पसरावा ॥ पतितहि० ॥ ३ ॥ कोण दुजा प्रभु विनवुन ज्याला । दुःखाब्धी उतरावा ॥ पतितहि० ॥ ४ ॥ दास विनवितो अनुदिन देवा । माझा लोभ धरावा ॥ पतितहि० ॥ ५ ॥

१६. राग यमन—ताल चौताल.

ध्याउंया। सत्य सनातन जो प्रभु पूर्णज्ञान आनंद ॥ ध्रु० ॥ निराकार जो शुद्ध। शांतिरूप परमात्मा सर्वात्मा जगचालक अ-द्वैत शिव अनंत ॥ ध्याउंया० ॥ १ ॥

१७. राग देस—ताल चौताल.

अरे मन तूंही। भजरे भजरे साहिबको नाम ॥ ध्रु० ॥ ज्या कारन तोंहे। प्रभुने रचो है सो तूं नाहिं करत है काम ॥ अरे०॥ १ ॥

१८. राग असावरी—ताल चौताल.

अतप्रताप तेरो । जगमें हो प्रभुराव राज बहादुर ॥ ध्रु० ॥ नांव सुनत भक्त। आवत धाय धाय पावत मन इच्छा फल तिनको आधार ॥ अत० ॥ १ ॥

१९. राग यमन—ताल चौताल.

करुणा। असोया मलिन बहु पापी संतानीं ॥ ध्रु० ॥ अपराध बहु-विधहि तरि।पिता करि दया त्यजी न तनया दोषी॥करुणा०॥१॥

२०. राग हिंडोल—ताल त्रिवट. ( अष्टपदी. )

हरिन तहान सदा परमेश्वर-पाद-कमल-मधु-पानें । त्यजुनि मधुर मकरंद कसें जलपान किजे मधुपानें। पळविन भवहिम नामधुपानें । मिळविन मग चिर शांतिसुखाप्रति तदितरकाम-

धुपानें ॥ ध्रु० ॥ लेइन चरण-सरोवर-समुदित सुंदर नखरुचि मुक्ता । न इतर भूषण रुचिर गमे मज अस्थिर-सुख-रुचि-मुक्ता ॥ १ ॥ जो शरणागत-कल्पतरू तो त्रिभुवनपति गवसावा । पद-सहकार-तरूवर मम मन कोकिल विहग वसावा ॥ २ ॥ यद-मलकीर्ति दिगंत मुदित कारि नतजनतावनवासा । मिळवुनि तच्चरणाश्रय चुकविन नवजनिता वनवासा ॥ ३ ॥ अनुदिन गाइन भगवदमलयश जें सहज निजपदा ने । फळ न मिळेल तसें कितिहि करुनि दुःसह तप जप दानें ॥ ४ ॥ निशिदिनिं पाहिन भगवंताचें चरण-कमळ नयनांहीं । इतर विलोकुनि विफल जसें बहु दान जरि विनय नाहीं ॥ ५ ॥ विषयरसासि विरसकर निर्मल मधुर विपुल रस नामीं । पिउनि सतत भवभय-हर तो रस करिन सफळ रसना मीं ॥ ६ ॥ पळहि न सोडिन पदयुग जें हरि पतितनमज्जन-भीतें । तारक नाव कशी त्यजिजे तरि जलधि-निमज्जन-भीतें ॥ ७ ॥ सुखकर मजला विश्वपतीचें पदरजनच वसुधा ही । तच्चरण-कमल-मकरंदासम देइल न चव सुधा ही ॥ ८ ॥

२१. राग बेहाग—ताल त्रिवट.

अनलस मी तुज नित्य भजावें ॥ ध्रु० ॥

नित्य भजावें नित्य नमावें । नित्य शरण तुज जावें ॥ अन० ॥ १ ॥

तव पदकमलीं अलिसम दीनें । आनंदांत निजावें ॥अन०॥२॥
नश्वर एथें सौख्य सकळ ही । हें पुरतें समजावें ॥ अन० ॥३॥
नित्य सुखाचा लाभ तव पदीं । सत्वर हें उमजावें ॥अन०॥४॥
भक्तिलतेचें देवा माझ्या । चित्तीं बीज रुजावें ॥ अन० ॥ ५ ॥

२२. राग पिलू—ताल दीपचंदी.

प्रभुविण संकट कोण निवारी ॥ ध्रु० ॥
दीनसखा तरि कोण असा कीं । दुःख हरी भय वारी ॥प्रभु०॥१॥
संकटसमयीं शरण रिघावें । कोण असा कैवारी ॥ प्रभु० ॥२॥
कोण असा कीं षड्रिपु यांची । हटविल थोर सवारी ॥प्रभु०॥३॥
व्यथित जिवांना कोण सदय तो । देइल शांतिमवारी ॥प्रभु०॥ ४॥
दास विनवितो मजवरि देवा । सोडि कृपेचें वारी ॥ प्रभु०॥५॥

२३. राग असावरी—ताल त्रिवट ( अद्धा.)

सतत तुझें प्रभु मीं यश गावें । तव भजनीं रंगावें ॥ ध्रु० ॥
त्वदितरलोभें प्रभु नच माझें । चित्त कधीं जंगावें ॥सत० ॥१॥
न घडे प्रभु मज जरि तव सेवा । तरि कां व्यर्थ जगावें ॥सत०॥२॥
त्वत्प्रेमामृत याचितसें मी । काय इतर मागावें ॥ सत० ॥ ३ ॥
घनमकरंदीं तव पदकमलीं । मनभृंगें गुंगावें ॥ सत० ॥ ४ ॥
दास विनवितो दीनसख्या तुज । मदघनगा भंगावें ॥सत०॥५॥

ऐ. क्राक ३९६



२४. राग बेहाग—ताल चौताल.

प्रभु तव ध्यांनीं मन्मन राहो स्थीर ॥ ध्रु० ॥ तुझ्यावीण मातें । पळभर ही न पडो प्रभु चैन ॥ प्रभु० ॥ १ ॥

२५. राग जोगी–ताल त्रिवट.

सुनो जी दयानिधि । हरो चित्तकी आधि ॥ध्रु०॥ भक्तीसें मन दीनदयामय पामे सौख्य हमारा । ध्यान भजनको निसुदिनु करके गावें गून तुमारा ॥ सुनो० ॥ १ ॥ त्रिभुवनका तुम नाथ बिराजत सुखका सब हो दाता । सबही तुम हो आप्त हमारा पिता माता भ्राता ॥ सुनो० ॥ २ ॥ गावत नाचत पादकमलपर रखवूं शीस दयाला । पालन करना दीन दासका तुम हो पालनवाला ॥ सुनो० ॥ ३ ॥

२६. राग तोडी–ताल त्रिवट.

कृपाघना तुज कां नये करूणा । शुकसनकादिक वंदिति चरणा ॥ध्रु०॥ उत्कंठा मनीं पाय पहाया । लागली निशिदिनीं जगदाभरणा ॥ कृपा० ॥१॥ अंतरिंचा तूं जाणसि आशय । पूर्ण करिशी कधीं अघसंहरणा ॥कृपा० ॥२॥ ध्यानभजन मी कांहींच नेणें । दास ह्मणवितों पतितोद्धरणा ॥ कृपा० ॥ ३ ॥

२७. राग बहार–ताल एका.

देखितां तुझ्याचि या अतुलप्रेम आननीं । काय भय संसार शोक-घोर-विपद-शासनीं ॥ ध्रु० ॥ अरूणोदयीं अंधार जे-

वि जाय जगत सोडुनी । तेंवि देव तुझें ज्योति मंगलमय विराजितां भक्तहृदय वीतशोक होय तुझ्या दर्शनीं ॥ देखितां० ॥१॥ तुझी करुणा तुझें प्रेम हृदयीं प्रभो भावितां । उमळे हृदय अश्रुधारा धरिल कोण दाबुनी । जय करुणामय जय करुणामय तुझे गुण गाइं मी । जाय जरी जावो प्राण तुझ्या पदसाधनीं ॥ देखितां० ॥ २ ॥

२८. राग बेहाग—ताल त्रिवट.

तूं मेरे प्राण आधार ॥प्रभुजी० ॥ ध्रु० ॥ नमस्कार दंडवत बंदना । अनकबार जाऊं वार ॥प्रभु० ॥ १ ॥ उठत बैठत सोवत जागत । ये मन तुजही चितार ॥प्रभु० ॥ २ ॥ सुख दुःख मनकी सबही बर्था । तुजही आज्ञा सार ॥प्रभु० ॥ ३ ॥ तूं मेरे ओट बल वुद्ध धन तुमही । तूं मेरे परवार ॥ प्रभु० ॥४॥ जो तुम करो सोई फल हमरे । पेख नानक गुरुचरणार ॥ प्रभु० ॥ ५ ॥

२९. राग जोगी—ताल एका.

देवा तुझा महिमा थोर । किति म्यां गावा तो ॥ध्रु०॥ अवघी जनाची सोडुनि लाज । ध्यातों मुख्यचि हें मम काज । सदया माझे हृदयिं विराज । मजला आज दर्शन दे ॥ देवा० ॥१ ॥ नलगे मजला मान जनांत । मागें जोडुनि दोन्ही हात । नाणुनियां मनिं दिन वा रात । रहावें गात गुण तुझे॥ देवा० ॥ २ ॥

जडुं दे चरणीं तुझिया प्रीत। घडतां न तसें व्यर्थ जिवीत। भेटें मजला प्रेमभरीत। होईं विनीत त्वच्चरणीं ॥ देवा० ॥३॥ जडतां तझिये ठायीं भाव। देशी दासा चरणीं ठाव। देवा स्तवितों दीना पाव। अन्य उपाव न करीं मी ॥ देवा० ॥ ४ ॥ दीनांची तूं जाणशि जाण। ममतेचें हें शुद्ध प्रमाण। दुःखापासुनि करिशी त्राण। रक्षुनि प्राण संकटीं ॥ देवा० ॥५॥

३० राग रामकली—ताल त्रिवट.

हे करुणामय दीनसख्या तव येउनि उभलों द्वारीं ॥ ध्रु०॥ तुजविण दीना कवण प्रभु तारी दुस्तर या संसारीं ॥ १ ॥ संपद विषमय तुजविहीन जविन मृत्युसमान। विपद संपद तव पदलाभें मृत्यु तो अमृत-सोपान ॥ २ ॥

## नीतिपर व ध्यानास साह्यकारी गीतें.

३१. राग काफी–ताल दीपचंदी अथवा राग मालकंस–ताल त्रिवट.

तोंवरि तळमळरे तळमळरे । नाहीं भक्तिबळरे ॥ध्रु० ॥ विवेक जागा करिना । जोंवरि शांति जिवीं दृढ धरिना ॥ तोंव० ॥ १ ॥ उदंड करितां कर्म । चुकला परब्रह्मीचें वर्म ॥ तोंव० ॥ २ ॥ दास ह्मणे सद्गुरुपायीं । जोंवरि मन हें मुरलें नाहीं ॥ तोंव० ॥ ३ ॥

३२. राग तोडी—ताल त्रिवट.

ब्रह्मविचार करा । गडेहो ब्रह्मविचार करा ॥ ध्रु० ॥ नश्वर मानुनि हें भववैभव । पाहुनि मोह तरा ॥ गडे० ॥ १ ॥ सद्गुरुचें चरणामृत सेवुनि । कांहीं विराग धरा ॥ गडे० ॥ २ ॥ दास ह्मणे रे तें स्थिर चिंतुनि । अस्थिर हें विसरा ॥ गडे० ॥ ३ ॥

३३. राग खमाज—ताल चौताल.

गाउंया तयाचें नाम । रचिलें ज्याणें विश्वधाम । दयेशिं ज्याचे नाहीं विराम । वाहे सतत धारे ॥ ध्रु० ॥ ज्योति ज्याचें गगनीं गगनीं । कीर्ति भाति अतुल भुवनीं । प्रीति ज्याची पुष्पितवनीं कुसुमित नवरागें ॥ गाउंया० ॥ १ ॥ ज्याचें नाम दुःखशमन । पापहृदयतापहरण । प्रसाद ज्याचा शांतिरूप भक्तहृदयीं जागे ॥

अंतहीन निर्विकार । महिमा ज्याचा होय अपार । ज्याच्या शक्तिवर्णनीं शिणति बुद्धिवाणी ॥ गाउंया० ॥ २ ॥

३४. राग झिंजोटी—ताल त्रिवट.

गा हो जगपति जगवंदन । ब्रह्म सनातन पातकनाशन ॥ध्रु० ॥ एक देव त्रिभुवनपरिपालक । कृपासिंधु सुंदर भवनायक ॥ गा हो०॥ १ ॥ सेवकमनोरथपूरण कर्त्ता । विद्या-संपद-बुद्धि- प्रदाता ॥ प्रार्थी चरण भक्त कर जोडुनी । देई प्रेम सुचित्तचकोरा ॥ गा हो० ॥ २ ॥

३५. राग जयजयंती—ताल त्रिवट.

दयासागर पिता करूणानिधान । विसरूं नको मना विसरूं नको क्षण ॥ ध्रु० ॥ रोग शोक पाप दुःखीं । तोचि ठाके संमुखीं । सोडुनि दुर्बल सुता नाहीं करित गमन ॥ दया० ॥१॥ उघडोनि हृदयद्वार । हाक मारीं वारंवार । देईं प्रीति उपहार करी दर्शन ॥ दया० ॥ २ ॥

३६. राग कलंगडा—ताल त्रिवट.

सृष्टिस्त्रष्टा अज सर्वसमर्थ परमेश्वर तो हा । सद्रुप सन्निध आहे पहा ॥ ध्रु० ॥ नधरीं दुर्जनसंग कदापि दुःखद अंतर्दाहा । निषेधक सन्निध आहे पहा॥ सृष्टि० ॥१॥ घालुनी चित्त असारीं कां हें उधळीसी वय आहा । पुसणार सन्निध आहे पहा ॥ सृ-

ष्टि० ॥ २ ॥ नको अन्यायमार्गें चालूं जोडेल पाप महा । शास्ता हा सन्निध आहे पहा ॥ सृष्टि० ॥ ३ ॥ घोर न धरितां निर्वाहाचा भार प्रभुपदीं वहा । निजधन सन्निध आहे पहा ॥ सृष्टि० ॥ ४ ॥ अपरिहार्य विपत्तीलागीं धैर्यविवेकें सहा । सुखकर सन्निध आहे पहा ॥सृष्टि० ॥५॥ दीनबंधु असें ज्याला ह्मणती त्याला संकटीं वहा । दयाघन सन्निध आहे पहा ॥ सृष्टि० ॥ ६ ॥ जगदीश्वर भयनाशक त्यातें संतत चिंतित रहा । सखा तुज सन्निध आहे पहा ॥ सृष्टि० ॥ ७ ॥

३७. राग कलंगडा—ताल त्रिवट ( धिमा.)

पुरे तें एक आह्मां साचें । सुमंगल नाम अनंताचें ॥ ध्रु० ॥ तीर्थें व्रतें प्रतिमाअर्चन देहदंडन हवनादी । असार वा हीं सारीं साधनें लागुं नका या नादीं ॥ पुरे० ॥ १ ॥ भेद उपेक्षा मत्सर सोडुन एकामेकावरती । जगदीशाचें प्रिय साधाया आह्मी करावी प्रीति ॥ पुरे० ॥ २ ॥

३८. राग सारंग—ताल एका.

अखंडितश्री सद्गुणमंडित परमेश्वर पंडित राणा । शिरुनि साधुच्या झुंडित त्याला धुंडित जाउनि मनीं आणा ॥ ध्रु० ॥ अघहारक सुखकारक तारक विश्वाचा उद्धारक जो । निजा-

नंद सुखकंद तयाचा छंद मनीं संतत उपजो ॥अखं० ॥१॥ जगन्नियंता सद्गतिदाता प्रणताचा प्रिय कैवारी । पडतां जड भारी संसारीं निजदासाचें भय वारी ॥ अखं०॥ २ ॥ जीवितेश परमेश तयाचा निदेश हाच स्वदेश खरा । हरूं शकति ना अरि कोणी ही वतन सुखाचें हेंचि धरा ॥ अखं० ॥ ३ ॥

३९. राग झिंजोटी—ताल एका.

मना सावध सावध सावध त्राणा रे ॥ मना० ॥ ध्रु० ॥ क्षणिक सुखाचा लोभ धरुनियां । नको भुलूं त्रिभुवन राणा रे ॥ मना० ॥ १ ॥ होउनि निश्चल अनुदिन भावें । करिं मंगलगुणध्याना रे ॥ मना० ॥ २ ॥ नित्य सुखावरि देउनि दृष्टि । तुच्छ करीं धनमाना रे ॥ मना० ॥ ३ ॥ या नरतनुचें सार्थक करिं बा । आठवीं पुरुष पुराणा रे ॥ मना० ॥ ४ ॥

४०. राग भैरवी—ताल त्रिवट.

वद वद वद वद मनुजा मधुर नाम वाचे । हर हर भव आपदांसि त्यजुनि भय जनाचें ॥ ध्रु०॥ सोडुनियां लोभ सकल चित्त करुनि परम विमल। भक्तिरसें कर प्रेमल भजन मंगलाचें ॥ वद० ॥ १ ॥ अतिविनयें करुनि नमन अर्पुनियां हृदयसुमन । दृढ भावें करि पूजन जगद्वंदनाचें ॥ वद० ॥ २ ॥ सा-

वध हो करिशि काय जन्म अखिल व्यर्थ जाय । आठविं प्रभु जो हरि भय शरणागताचें ॥ वद० ॥ ३ ॥

४१. राग भैरवी—ताल त्रिवट.

वद वद वद वद रसने नाम मंगलाचें । कर कर कर सार्थक या अतुल जीवनाचें ॥ ध्रु० ॥ अतिसुंदर तनु हि सकल क्षणीं एक होय विकल । ह्मणुनि स्मरीं चरणकमल अनिश प्रभुवराचें ॥ वद०॥ १ ॥ तोचि दीनबंधु हरिल प्रेमें अति-जाड्य अखिल । सद्भावें हृदय भरिल स्वीयसेवकाचें ॥ वद०॥ २ ॥ कोण प्रभूवीण सदय सत्कार्यी देइल जय । घोर दुःख टाळिल भय दीन अनाथाचें ॥ वद० ॥ ३ ॥ आठविं तरी जगदीश्वर तोचि एक भवभयहर । भजन अतिप्रेमल कर निशिदिनीं तयाचें ॥ वद० ॥ ४ ॥

४२. राग काफी—ताल त्रिवट.

तारक श्रीजगदीश्वर मानुनि । आनंदें शरण रिघा ॥ जनहो ॥ तारक० ॥ ध्रु० ॥ दीनसखा वरदायक तो प्रभु । नाशील सकल अघा ॥ जनहो० ॥ १ ॥ भावबळें मन सुस्थिर करुनी। गा प्रेमें अनघा ॥ जनहो० ॥ २ ॥ विहित संतोषीं मंगल ध्यानीं । धुवा मनोमळ अवघा ॥ जनहो० ॥ ३ ॥ नित्य सुखास्तव अनुदिन सेवा । नामामृत कामदुघा ॥ जनहो० ॥४॥

४३. राग कल्याणीचा मांझ—ताल त्रिवट.

हरिल अघभार करिल भवपार । विश्वाचा आधार । गाहो गाहो जगदोद्धार ॥ ध्रु० ॥ धनमानादिक नश्वर ऐहिक । लोभ नको अनिवार ॥ विश्वाचा० ॥ १ ॥ नानापरिच्या विषयवासना । चित्ता करिति विकार ॥ विश्वाचा० ॥ २ ॥ सुविमलचित्तीं भाव करा दृढ । सोडा दंभ असार ॥ विश्वाचा० ॥ ३ ॥ सत्संगातें जोडुनि प्रेमें । भजन करा अनुवार ॥ विश्वाचा० ॥ ४ ॥

४४. राग काफी—ताल दीपचंदी.

जगदीश चरणारविंद । खरा हाचि स्वानंद ॥ ध्रु० ॥ त्याच्या पदाविण सर्व हि तो शिण । सेवुनि व्हावें कां मंद ॥ खरा० ॥ १ ॥ विसरूनि त्याला विषयहाला । पिऊनि कां व्हावें धुंद ॥ खरा० ॥ २ ॥ सुखसद्माच्या पदपद्माचा । बहु सुरभी मकरंद ॥ खरा० ॥ ३ ॥ भक्तिभावें प्रभुला ध्यावें । जो मूळ सद्गुणकंद ॥ खरा० ॥ ४ ॥ मन दिनरजनी जागो तद्भजनीं । लागो प्रभुचा छंद ॥ खरा० ॥ ५ ॥

४५. राग खट—ताल एका.

धन्य देव पूर्ण ब्रह्म । प्राणेश्वर दीनबंधु । दयासिंधु करूणानिधि । चित्तव्यथा वारी हो ॥ ध्रु० ॥ भगवज्जन हृदिभूषण । पावन प्रभु जगजीवन । पापिगति परमशरण आश्रित भय-

हारी हो ॥ धन्य० ॥ १ ॥ अच्युत आनंदधाम । सत्याश्रय सत्यकाम । जागृत जीवंत देव । सेवक कैवारी ॥ ज्ञानानल दीप्यमान हृदाधार हृदयेश्वर । हितकारण हरि कृपाळु भक्तमनविहारीहो ॥ धन्य० ॥ २ ॥ अविनश्वर पुराणपुरुष । भगवान् भक्तवत्सल । कल्याण अनंत विश्वभुवनधारी ॥ जीवितेश हृदयरत्न । परमायन सत्यपुरुष । सदानंद जगद्गुरु जगज्जनहित कारीहो ॥ धन्य० ॥ ३ ॥

४६. राग पिलू—ताल त्रिवट.

चिंता सर्वांची हरीला ॥ ध्रु० ॥ पक्ष्या पदरीं संचय कैंचा । चारा पुरवि तयाला ॥ चिंता० ॥ १ ॥ किडि मुंगी कांहीं मागत नाहीं । साखर देई तयाला ॥ चिंता० ॥ २ ॥ अमृत ह्मणे हरिघरिं काय उणें । जो मागे देइ तयाला ॥ चिंता० ॥ ३ ॥

४७. राग भैरवी—ताल त्रिवट.

वद नामचि तें सार । रसने वद० ॥ ध्रु० ॥ गोरस मधुरस इक्षुरस सुधारस । नवरस तेहि असार ॥ रसने० ॥ १ ॥ तळमळसी किति करिसी कीं हे । वेडे वेडे चार ॥ रसने० ॥ २ ॥ भक्त मयूर कृपाघन ईश्वर । उघडिल मुक्तिद्वार ॥ रसने० ॥ ३ ॥

४८ राग जोगी—ताल एका.

साधुवृंद ज्या गाय रे । ध्याउं तयाचे पाय रे ॥ आह्मां सकलां बंधुजनांचा । जो कां बापमाय रे ॥ ध्रु० ॥ सर्व शक्तिमान रे ।

अनंत पूर्ण ज्ञान रे ॥ दया क्षमा शांति यांचें । होय अधिष्ठान रे ॥ साधु ०॥१ ॥ भाविक मनोविराम रे । ठाके घेतां नाम रे ॥ पीडित जन जे त्यांलागीं तो । हृदयाभिराम रे ॥ साधु०॥ २ ॥ संकटीं घे धांव रे । घेउनि दया नाव रे । नेउनि सोडी पैल तीरा । रंक न पाहे राव रे ॥ साधु० ॥ ३ ॥ तारणीं प्रवीण रे । आतर भक्तीवीण रे ॥ नलगे देणें उरला कैंचा । भवसागरीं शीण रे ॥ साधु० ॥ ४ ॥ गाऊं मंगलधाम रे । देइल सुखविश्राम रे ॥ सुविमलचित्तें लीन होउनी । तया करूं प्रणाम रे ॥ साधु० ॥ ५ ॥

## साक्या.

राग पिलू—ताल एका.

१

दीनदयाळा सृष्टीपाळा देवा आदिपुरुषा । अतिनम्रपणें नमितों हिन मी ऐक दिनाची भाषा ॥ १ ॥ तव इच्छेनें जडती तुटती ब्रह्मांडाच्या माळा । ऐसा प्रभु तूं समर्थ अतिशय भय तूझें कळिकाळा ॥ २ ॥ त्या तुज विसरुनि अनुचित धरिली लोकलाज म्या मूढें । झालों नीच विषयलोभी मम कशि गत होइल पूढें ॥ ३ ॥ शाश्वत धन तुज हृदयिं न धरितां इंद्रीयांचे अर्थ । क्षणभंगुर ते काय करावे अंतीं धुलिसम व्यर्थ ॥ ४ ॥ करितिल काय लोक दूर मम अंतरिंचा अघध्वांत । तव कृपादीपाविण कैसें होइल सुप्रभ स्वांत ॥ ५ ॥ मच्छीरावरि अनंतशक्ति नाथा तूझे पाय । नित्य विराजित असले तर जन करितिल माझें काय॥६॥ जाणुनि हें मी शरण अनन्य आलों तुज गुरुश्रेष्ठा । लोक हवें तें ह्मणोत आतां करोत माझी चेष्टा॥७॥

२

देवा असशी सर्वकाळ तूं माझा चित्तविसावा । वांछितसें मी निशिदिनिं हें कीं तव मुखचंद्र दिसावा ॥ १ ॥ तव करुणेनें देवा माझा बुद्धिभ्रम निरसावा । प्रभु तुजवांचुनि मज इत-

राचा छंद कधींहि नसावा ॥ २ ॥ देवा आहें मंदमती मी नकळे मजला कांहीं । अज्ञानजलीं भ्रमतों श्रमतों बहुविध मीं शंकांहीं ॥ ३ ॥ निर्दोष करीं चक्षू माझे सुज्ञानशलाकांहीं करिशिल करुणा तर मग उरतिल संशयपटलें कां हीं ॥ ४ ॥ चुकलों बहु तरि देवा माझा नच अव्हेर करावा । क्षमा करावी दीनवत्सला चित्तीं लोभ धरावा ॥ ५ ॥ अज्ञानोत्थित माझ्या मतिचा प्रभु अंधार हरावा । दया करावी ऐशी स्वामी कीं हा पतित तरावा ॥ ६ ॥

३

काया वाचा मन हीं चरणीं म्यां तुझिये ठेवीलीं । त्यागुनि अ-वघ्या ऐहिक वांछा भक्तिसुधा सेवीली ॥ १ ॥ नाहीं नाहीं आप्त इतर मज प्रभुराया तुजवीणें । करिशी माझा त्याग जरी तूं व्यर्थ तरी हें जीणें ॥ २ ॥ मिळल्या घडिला होवो देवा सार्थक या देहाचें । मंगलधामा आळविं तुजला नामा गाउनि वाचे ॥ ३ ॥ धांव धांव बा भक्तवत्सला त्रैलोक्याच्या नाथा । भवभयभंगचि निश्चित होईल ठेवियल्या पदिं माथा ॥ ४ ॥ करुणार्णव तूं असशी देवा त्वद्गुण मी किति वानूं । कोण अ-सारे थोर असे कीं त्या तुजसम मी मानूं ॥ ५ ॥ स्मरणीं तुझिये

शांति जिवा या होई हे जगजेठी । आस मनींची आहे ही कीं व्हावी त्वत्पदभेटी ॥ ६ ॥

४

दीनदयाळा स्वेच्छेनें त्वां उद्धरिले जन कोटी । तेवीं ने मज मोक्षा घालुनि मम अपराधां पोटीं ॥ १ ॥ नीर नदीचें तृषितालागीं वाटे सौख्यद जेवीं । भक्तिरसामृत या तव शिशुतें देवा लागो तेवीं ॥ २ ॥ आठवि देवा तुजला क्षणभर विसरुनियां संसारा । नाठवितां मी दुःखें साहूं केवीं विश्वाधारा ॥ ३ ॥ जीवन अमुचें इहलोकीं या शाश्वत सखया नाहीं । जाणुनि ऐसें निजभक्तीच्या सुमना त्वत्पदिं वाहीं ॥ ४ ॥ निशिदिनिं शरणागत मी प्रभु तव आठवितों पदपद्मा । देउनि तरि मज प्रेमालिंगन न्यावें झणि सुखसद्मा ॥ ५ ॥

५

भक्तवत्सला करुणागारा प्रार्थितसें मी भावें । शुद्ध करुनियां अंतर माझें संतत तेथ वसावें ॥ १ ॥ कृतार्थ व्हावें तव दासानें सज्जनसंग घडावा । प्रभु अविचारें दुर्जनपंथीं पाय कधीं न पडावा ॥ २ ॥ देवा अनुदिन परोपकारीं माझा देह झिजावा । विनय होउनी सुस्थिर त्हृदयीं सकलहि दुर्मद जावा ॥ ३ ॥

Janardan B. Godbole



६

तुझ्या कृपेचा सुगंधशीतल वायु स्पर्शोनाशा । खोल बुडालों आहों डोहीं पापाच्या अविनाशा ॥ आह्मी पावों नाशा । तारीं गा जगदीशा ॥ १ ॥ पापसमुद्रा आटवुनीयां दयासुजल वृष्टीनें। अस्मज्जन्म सफलचि करावें मागों दीनपणानें ॥ पूर्ण करावी आशा । इतुकी ही परमेशा ॥ २ ॥

७

हे जगदीशा दीनदयाळा नमितों तव चरणांला । त्यांवांचुनि मी साधन नेणें दुस्तरभवतरणाला ॥१॥ चुकलों बहु तरी देवा माझा नच आव्हेर करावा । क्षमा करावी दीनवत्सला चित्तीं लोभ धरावा ॥ २ ॥

# दिंड्या.

राग पिलू—ताल एका.

१

नमन करुनी तुज प्रार्थिं देवराया। देइं दर्शन बा दीन तूं नरा या ॥ कोण तुजविण मज अन्य पाळिताहे। कृपादृष्टीनें पूर्ण मला पाहे ॥ १ ॥ प्रभो तुजला मी भक्तिबळें साधीं। नसे त्याविण मज अन्य रे उपाधी ॥ तरी दासा या भेट दे अनंता। पाव पाव सख्या पूर्ण कृपावंता ॥२॥ धांव घेतों मी शीघ्र प्रभूराया। चरणकमलां तव मानसीं धराया ॥ करिशि मजवरि अत्यंत प्रीति माया। नसे शक्ति मज पूर्ण ती वदाया ॥ ३ ॥ येइं त्द्दयीं मम येइं मायबापा। हारिं माझ्या तूं हारिं सकल पापा ॥ छेदिं कामादिक षडरि हेतु तापा। गांजलों मी बहु धांव शांतिरूपा ॥ ४ ॥

२

सख्या भगवंता सृष्टिच्या सुमित्रा। परमपुरुषा हे चिन्मया पवित्रा ॥ आमुच्या तूं आधार शिथिलगात्रां। तुझी भक्ति बा पापहारि मात्रा ॥ १ ॥ अखिल ब्रह्मांड प्रभो तूज गातें। तूंचि आश्रय बा एकला जगातें ॥ तुझें आमुचें मी काय वंदूं नातें।

कोण मानव तो शके वर्णु तूतें ॥ २ ॥ नाम तूझें बा पापराशि जाळी । मुक्त झाले ते गात पिटुनि टाळी ॥ संत योगी कवि साधु सर्व काळीं । भेटलाशी त्यां दिसे अह्मां डोळीं ॥ ३ ॥

३

असों देवा तव चरणिं आह्मी लीन । शरण आलों लेंकुरें तुझीं दीन ॥ करूं तूझें प्रेमळ नामगान । जोंवरी या देहांत पंचप्राण ॥ १ ॥ थोर आह्मी अपराधि दीनबंधू । घेइं पदरीं आह्मासि कृपासिंधू ॥ नित्य भावें तूजला दास वंदू । सेवुं आनंदें नामसुधाबिंदु ॥ २ ॥ येउ आनंदें दिवस उत्सवाचा । सतत पुरवीं हा हेतू समाजाचा ॥ सत्यधर्माची भक्ति जना लागो । बंधुप्रीती हृदयांत नित्य वागो ॥ ३ ॥

४

सर्व सृष्टी ही तुझाची पसारा । तुझ्या इच्छेनें चालित निराकारा ॥ बुद्धि देईंगा तूजला उदारा । आठवूनीया क्रमूं वेळ सारा ॥ १ ॥ असो संतत मन तव प्रीतिकामी । ध्याउं तुजलाची नित्य सर्व कामीं ॥ राहु आत्मा हा तूझिया लगामीं । हाचि जायासी उपाय सुखधामीं ॥ २ ॥

५

तुला वंदीं मीं दास देवराया । नसे बुद्धि बा त्वत्स्तुती कराया ॥ असें पापी मीं दीन ये सहाया । शक्ति नाहीं बा दुःख हें सहाया ॥ १ ॥

६

येइं धांवुनियां दीनबंधु येईं । येउनीयां मज भेट तुझी देईं ॥ अर्पिलेलें मम हृदयसुमन घेईं । चरणिं तूझ्या या सेवकासि नेईं॥ १ ॥ घोर दुःखाचा आलिया प्रसंग । सुबुद्धीचा बा होउं नये भंग ॥ सज्जनांचा परि नित्य घडो संग । झटो सत्कार्यीं हें सदैव अंग ॥ २ ॥ नेइं मजला तव सुखद मंदिराशीं । हेंचि मागें मी प्रभो तूजपाशीं ॥ देह माझा जरि असे पापराशी । मुक्ति मजला तरि देइं कृपाराशी ॥ ३ ॥ जगन्नाथा हे विभो सर्व साक्षी । सदा कारुण्यें दीन दास रक्षीं ॥ तुझ्या पायांविण अन्य मी न लक्षीं । ह्मणुनि मजलागीं ना कदा उपेक्षीं ॥ ४ ॥

७

अहर्निशि हे प्रभु घोष कीर्तनाचा । करो आनंदें दीन हीच वाचा ॥ असत्कार्यीं कल नसो मानसाचा । संग व्हावा परि संत सज्जनांचा ॥ १ ॥ विश्वपाला हा विनवि दीन पायां । न हें जाऊं दे जन्म अखिल वायां ॥ झटो क्षणभर तरि नाशवंत काया । दयादृष्टीनें स्वजनहित कराया ॥ २ ॥ मागणें हें तुजपाशिं जगत्पाळा । कोटि अपराधां विसरुनी दयाळा ॥ द्यावि उत्तम गति दीन बाळकाला । अर्पि सेवक सप्रेम गीत-माला ॥ ३ ॥

८

नको मना आचरूं पाप कर्म । कसें करील अधर्म तुझें शर्म ॥ कोण सृष्टीचे पालटील नेम । प्रसवेल अन्याय कसा क्षेम ॥१॥ रुईवृक्षा येतील कसीं केळीं । वृकी उदरीं जन्मेल काय शेळी॥ कसे येतील काजऱ्यास आंबे । हेमधर्म पावेल काय तांबें ॥२॥ मदें व्हावें कां वृथा दोषशील । फळ पापाचें कोण चूकवील ॥ खड्ग बंदूक तोफ बाण चाप । अस्त्रें खंडीती काय पाप ताप ॥ ३ ॥ दुष्कृताचा परिणाम चूकवेना । जरी आली साह्यासी कोटि सेना ॥ मना पापाचा घेइं जाइं वीट । शरण प्रभूला सत्पथेंचि नीट ॥४ ॥

९

कुठे वाणी ही मूढ सेवकाची । कुठे कीर्ती ती विश्वपालकाची ॥ कुठे चंचू ही अल्प पांखराची । कुठे थोरी ती अतुल सागराची ॥ १ ॥ काय वर्णूं मीं स्वामिच्या यशाला । काय सूर्याला उजळिती मशाला ॥ काय तूलानें जोखिजे नगाला । काय वस्त्रानें झांकिजे जगाला ॥ २ ॥ असो एकचि तो सदय सखा मातें । अन्य कोणीही पडति न कामातें ॥ सदा ज्यापाशीं अमुप कृपा नांदे । काय ईश्वर तो अभय मला ना दे ॥ ३ ॥

## अभंग ( दोन चरणी. )

१

जगताचा तूं आधार । जगताचें तूंचि सार ॥१॥ तूंच केली जगदुत्पत्ति । करिशी तूंच त्याची स्थिति ॥२॥ तूंच जगताचें जीवन । तुझे ठायीं रंगो मन ॥ ३ ॥

२

मन इच्छी हेंची देवा । नित्य घडो तुझी सेवा ॥१ ॥ नसो कोणाचाही हेवा । तृप्ति असो सदा जीवा ॥ २ ॥ द्वेष कोणाचा नसावा । स्नेह सर्वांशीं असावा ॥ ३ ॥ व्यर्थ मत्सर कशाला । सर्प घ्यावा कीं उशाला ॥ ४ ॥

३

क्रोध सत्वर गळावा । देह तेणें न जळावा ॥ १ ॥ लोभ नको ऐहिकाचा । रत्न मिळतां कां कांचा ॥ २ ॥ काम चित्तीं न माजावा । जीव पापाला लाजावा ॥ ३ ॥ भवजालीं न फसावा । व्हावा त्वत्पदीं विसावा ॥ ४ ॥

४

पापवन जें गहन । त्याचें करी तूं दहन ॥ १ ॥ अज्ञान तें सर्व सरो । मन तुला न विसरो ॥ २ ॥ दुष्टवासना प्रबळ ।

त्यांचें हटवावें बळ ॥ ३ ॥ झडो अंतरींचा मळ । राहो सदा तें निर्मळ ॥ ४ ॥

५

रक्षिसी जो सर्व जगा । तो तूं संभाळीं मज गा ॥ १॥ भवपथ हा बिकट । कोण वारील संकट ॥ २ ॥ नाहीं कोणी तुजवीण । मार्गदर्शक प्रवीण ॥ ३ ॥ आहे तुझा भरंवसा । नच करीं मी नवसा ॥ ४ ॥

६

तुज करून नमन । वाहीं भावाचें सुमन ॥ १ ॥ व्हावें षड्रिपुदमन । दुष्टवांछासंयमन ॥ २ ॥ होवो पापाचें वमन । आणि दोषांचें गमन ॥ ३ ॥ राहो तुझे पदीं मन । होवो तापाचें शमन ॥ ४ ॥

७

तुझ्या चरणीं माझा भाव । प्रभु दृढतर लाव ॥ १ ॥ सदानंदा तुझ्या पदा । जडो माझी आशा सदा ॥२॥ तुझ्या पायीं माझा हेत । देवा राहो सदोदित ॥३॥ स्वामी न करिं उदास । अति दीन तूझा दास ॥ ४ ॥

८

चिंतनासी नलगे वेळ । सर्वकाळ करावें ॥ १ ॥ सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥ २ ॥ पढिये सर्वोत्तमीं भाव । येर

वाव पसारा ॥ ३ ॥ ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सर्वदा ॥ ४ ॥

९

ठाकलोंसें द्वारीं । उभा याचक भीकारी ॥ १ ॥ मज भीक कांहीं देवा । प्रेम भातुकें पाठवा ॥ २ ॥ याचकाचा भार । नये घेऊं वेरझार ॥ ३ ॥ तुका ह्मणे दान । सेवा घेतल्यावांचून ॥ ४ ॥

१०

पतितपावना । दीनानाथा नारायणा ॥ १ ॥ तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥ २ ॥ ब्रह्मांडनायका । भक्तजनाच्या पाळका ॥ ३ ॥ जीवींचीया जीवा । तुका ह्मणे देवदेवा ॥ ४ ॥

११

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ॥ १ ॥ आतां मज ऐसें करीं । तुझे पायीं चित्त धरीं ॥ २ ॥ उपजला भावो । तुझे कृपें सिद्धि जावो ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । लाभ नाहीं या परता ॥ ४ ॥

१२

आल्या बहुत संपदा । नच व्हाव्या त्या दर्पदा ॥ १ ॥ आल्या जरी त्या आपदा । मन धांवो ईशपदा ॥ २ ॥ असो चित्तीं

सुविनय । नच कधीं सुटो नय ॥ ३ ॥ धनदारादिकें मद । चित्तीं नुपजो श्रमद ॥ ४ ॥

१३

पडतां जड भारी । दासीं आठवावा हरी ॥ १ ॥ हरिनामाचे चिंतनें । बारा वाटा पळती विघ्नें ॥२॥ तुका ह्मणे हरी । कांहीं उरूं नेदी उरी ॥ ३ ॥

१४

दया क्षमा शांती । तेथें देवाची वसती ॥१॥ पावे धांवोनियां घरा । राहे धरूनीयां थारा ॥ २ ॥ कीर्तनाचे वाटे । वराडीया ऐसा लोटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे घडे । पूजा नामें देव जडे ॥४॥

१५

सर्वज्ञाचीं बाळें । न करिती मुर्ख चाळे ॥ १ ॥ आह्मी कुलीनाचीं मुलें । टाकूं जपून पाउलें ॥ २ ॥ स्मरूनि संभावीत स्वेष्टा । करूं नये नीच चेष्टा ॥ ३ ॥ आह्मी थोराचीं लेंकरें । वागूं नीति सदाचारें ॥ ४॥

१६

भावबळ नाहीं जया । देव कैंचा लाभे तया ॥ १ ॥ देव भावाचा भुकेला । ऐसें तुका बोलियेला ॥ २॥ तरी भाव दृढ करा । चित्तीं वाहा शांताकारा ॥ ३ ॥ वाहीयेल्या तेथ ह्यातें । धांवेना

तें अन्यायातें ॥ ४ ॥ दास ह्मणे भावें जन । करि पापाचें द
हन ॥ ५ ॥

१७

जेणें देवा आळविलें । तेणें तया मेळविलें ॥ १ ॥ जेणें विषयां जोडिलें । तेणें तयाला तोडिलें ॥ २ ॥ जेणें दीनां त्रास दिला । व्यर्थ देह त्या लाधला ॥ ३ ॥ जेणें सन्मार्ग त्यागिला । व्यर्थ जन्म त्याचा गेला ॥ ४ ॥ विश्वाधारा तुझ्या पायां । न बा धरिल्या सर्व वायां ॥ ५ ॥

१८

पाहुं दे मुखकमळ । धांवें देवाजी निर्मळ ॥ १ ॥ थोर तूं बा ममताळ । तोडिसी हें भवजाळ ॥ २ ॥ दावीं सत्पथ सरळ । घेतों नाम हें प्रेमळ ॥ ३ ॥ जावो पापाचा तो गाळ । राहो हृदय निवळ ॥ ४ ॥ जीव होई तो विव्हळ । सांडियेल्या सज्जनमेळ ॥ ५ ॥ भक्तिवीणें जातां पळ । व्यर्थ जातो देह काळ॥ ६ ॥ नाहीं ढोंगाचा गाबाळ । रक्षि भाव चिरकाळ ॥ ७ ॥ तुझें गाईल्या मंगळ । देशि देवा दासां फळ ॥ ८ ॥

१९

धावें पावें बा अनंता । सर्व साक्षी कृपावंता ॥ १ ॥ राहे स्थीर तूं अंतरीं । देह अवसाना वरीं ॥ २॥ कदा न घडो वियोग ।

सफल होवो ध्यान योग ॥ ३ ॥ तुझ्या मार्गें भावें जातां । शीण न होवो भगवंता ॥ ४ ॥ तुझें नामसंकीर्तन । हेंच आमचें साधन ॥ ५ ॥ वदनीं तुझें मंगळ नाम । हाचि माझा मुख्य नेम ॥६ ॥ स्नान संध्या जप तप । नलगे व्यर्थ खटाटोप॥ ७ ॥ दृढ करूनीयां भाव । तुझे कार्यीं अर्पूं जीव ॥ ८ ॥ तुझी इच्छा घडो सदा । सहज जातील आपदा ॥ ९ ॥ तूंचि होसी पाठीराखा । आह्मां दीनजना सखा ॥ १० ॥ तेणें असों बा निर्भय । न गणुं काळाचें ही भय ॥ ११ ॥

## अभंग ( चार चरणी. )

१

तुज संगें देवा तुझीं बाळें असूं। गरीब कां दिसूं जगामाजी ॥१॥
दे तो सद्भावाचा शीरपेंच शीरीं। शेला भरजरी विनयाचा ॥२॥
आंगरखा प्रेम सुरंग साजिरा। मर्यादेचा बरा पीतांबर ॥ ३ ॥
रुमाल वैराग्य सद्गुणांचे हार। पाहूनी सुंदर मुका घेसी ॥ ४ ॥

२

देवा मज नाहीं बुद्धि तरि कांहीं। अज्ञानप्रवाहीं वाहातों मीं ॥१॥
दुष्टवासनांहीं चित्त शुद्ध नाहीं। पापमळीं पाहीं नाहातों मीं ॥२॥
एथील सुखें हीं मिश्रित दुःखांहीं। मूढमति मोहीं गुंतलों मीं ॥३॥
भवजलडोहीं भ्रमतों हा पाहीं। काम क्रोध यांहीं बुडालों मीं ॥४॥

३

थोर तुझी शक्ति थोरच संपत्ति। सर्व विश्व कीर्ति गाई तुझी ॥१॥
चंद्र सूर्य तारे तेजःपुंज सारे। भांडारींचे हिरे देवा तुझ्या ॥२॥
केले पृथ्वीवर अगणित नर। वंशाचा विस्तार देवा तुझ्या ॥३॥
ब्रह्मांड रचून करिशी पालन। कोण करी मान सामर्थ्याचें ॥४॥

४

करुणेच्या घरा देवा विश्वंभरा। देई मज थारा अन्य कोण ॥१॥
संसाराची वाट अत्यंत दुर्घट। दाखवील नीट अन्य कोण ॥२॥

दुःखाचे डोंगर आड येती फार। त्यांस करी दूर अन्य कोण ॥३॥
मजवरि देवा लोभ असों द्यावा। मजला विसावा अन्य कोण ॥४॥

५

नित्य अविकारी देवा मज तारी। नसे तुज भारी कांहीं देवा ॥१॥
लोभास मीं जरी नसें अधिकारी। तरी कृपा करी नित्य देवा ॥२॥
गांजिती षडरी त्यांस तूं निवारी। दीनाचा कैवारी तूंची देवा॥३॥
आहें निराधारी मज घे पदरीं। आपुलासा करी मज देवा ॥४॥

६

औषधीचीं पाळें भुमींतील कस। गाळुनिया रस कैसा घेती ॥१॥ नेणो कैसी होय साल त्वचा साड। शाखा डहाळ्या खोड वाढे कैसें ॥ २ ॥ कैशा पर्णपंक्ति येती पुष्पघोंस। सुरंग सुवास मधूसह ॥ ३ ॥ देवा तूझी लीला अगम्य नकळे। वृक्षालागीं फळें कैसीं येती ॥ ४ ॥

७

स्नेहरूपें आह्मा माता पिता भ्राता। भवडोहीं त्राता देवा तूंची ॥ १ ॥ अरिष्टांत थार संकटांत धीर। विपत्तींत स्थीर संपत्ति तूं ॥ २ ॥ क्लेशीं समाधान श्रमांत विसावा। अंतकाळीं देवा आधार तूं ॥ ३ ॥ इष्ट लाभ तूंची आमुचा शाश्वत। ओढी आशा हात पायीं तुझ्या ॥ ४ ॥

८

व्हावी मोक्षप्राप्ति पतितपावना । हीच माझ्या मना एक आस ॥ १ ॥ आस तूं मनींची जाणशी सकळ । होउनी कृपाळ पुरीव ती ॥ २ ॥ न ती पुरविशी तरि कोठें जावें । काय तें करावें अव्हेरील्या ॥ ३ ॥ अव्हेरील्या तुवां नेणता रे बाळ । करी तळमळ अंतरीं तो ॥ ४ ॥ अंतरीं न तूतें ठेवियेलें जेणें । व्यर्थ त्याचें जीणें दास ह्मणे ॥५ ॥

९

सर्व भावें आलों तुजची शरण । काया वाचा मनासहित देवा ॥ १ ॥ आणीक दुसरें नये माझे मना । राहिली वासना तुझे-ठायीं ॥ २ ॥ माझीये वरीचें कांहीं जड भारी । तुजवीण वारी कोण देवा ॥ ३ ॥ तुझे आह्मी दास आमचा तूं धनी । चालत दुरूनी आलों मागें ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां घेतलें धरणें । हिशेबाकारणें भेटी देईं ॥ ५ ॥

१०

तुझा दास ऐसा ह्मणती लोक पाळ । ह्मणऊनि सांभाळ करीं माझा ॥ १ ॥ अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ॥ २ ॥ माझे गुण दोष पाहातां नलगे अंत । ऐसें

माझें चित्त मज ग्वाही ॥ ३ ॥ नेणें तुझी कैसी करावी हे सेवा। जाणसी तूं देवा अंतरींचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे तूं या कृपेचा वा सिंधु। तोडी भवबंधू माझा देवा ॥ ५ ॥

११

जाणावें तें काय नेणावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंची सार ॥ १ ॥ करावें तें काय न करावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंची सार ॥ २ ॥ बोलावें तें काय न बोलावें तें काय। ध्यावे तुझे पाय हेंची सार ॥३ ॥ जावें तें कोठें न जावें तें आतां। बरवें आठवितां नाम तुझें ॥ ४ ॥ तुका ह्मणे तूं करिसी तें सोपें। पुण्यें होती पापें आमुच्या मतें ॥ ५ ॥

१२

बाळ मातेपाशीं सांगे तान भूक। उपायाचें दुःख काय जाणे ॥ १ ॥ तयापरी करीं पाळण हें माझें। घेऊनियां ओझें सकळ भार ॥ २ ॥ कासया गुण दोष आणिसील मना। सर्व नारायणा अपराधी ॥ ३ ॥ सेवाहीन दीन पातकांची रासी। आतां विचारीसी काय ऐसें ॥ ४ ॥ जेणें काळें पायीं अनुसरलें चित्त। निर्धार हें हित झालें ऐसें ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुह्मी तारिलें बहुतां। माझी कांहीं चिंता असो देवा ॥ ६ ॥

१३

जीवनावांचूनी तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥ १ ॥ न सांपडे जालें भूमिगत धन । चरफडी मन तया परी ॥२॥ मातेचा वियोग जालिया हो बाळा । तो कळवळा जाणा देवा ॥ ३ ॥ सांगावे ते किती तुह्माशीं प्रकार । सकळांचें सार पाय दावी ॥ ४ ॥ येचि चिंतें माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा ॥ ५ ॥ तुका ह्मणे तूं हें जाणसी सकळ । यावरी कृपाळ होईं देवा ॥ ६ ॥

१४

नेणें कैसा आलों कोठें तो मी जाय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ १ ॥ नेणें जन्मा आलों कराया तें काय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ २ ॥ नेणें भक्तीवीणें मुक्तीतें उपाय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ ३ ॥ व्हावया कृपेशीं पात्र प्रभूराय । धरीं तूझे पाय दीनबंधू ॥ ४ ॥

१५

मंगलवाणी ही वाचेनें वदतां । पुण्य हे अनंता जोडे दासा ॥ १ ॥ मनोमळ जाई नाम उच्चारितां । पुण्य हे अनंता जोडे दासा ॥ २ ॥ दीन बांधवांना संकटीं रक्षीतां । पुण्य हे अनंता जोडे दासा ॥ ३ ॥ भूकेल्यां तान्हेल्यां अन्नपाणी देतां । पुण्य हे अनंता जोडे

दासा ॥ ४ ॥ थकल्यां भागल्यां विश्रांति करीतां । पुण्य हे अनंता जोडे दासा ॥ ५ ॥ आंधळ्यां पांगुळ्यां कटीखांदे नेतां। पुण्य हे अनंता जोडे दासा ॥ ६ ॥ संकटीं शत्रूचीं संकटें हरीतां । पुण्य हे अनंता जोडे दासा ॥ ७ ॥

१६

पतित मी पापी शरण तूज भावें । पाप निर्दाळावें देवराया ॥ १ ॥ नाहीं नाहीं मज अन्य कोणि त्राता । तारीं बा अनाथा कृपासिंधु ॥ २ ॥ दिनाचा दयाळ दासांचा कनवाळ । दुष्टांचा तूं काळ जगदीशा ॥ ३ ॥ तारियेले भक्त देवा तूं अनंत । नकळे तुझा अंत पूर्णब्रह्मा ॥ ४ ॥

१७

कामादीक वैरी गांजीती अंतरीं ॥ तूं माझा कैवारी सर्वेश्वरा ॥ १ ॥ मान अपमान क्षणिक हें धन । यांत नको मन परात्परा ॥ २ ॥ संपत्ति विपत्ति असो कैशि स्थिति । नसे त्याची खंती दीनबंधु ॥ २ ॥ हाची माझा हेत तुझे ठायीं चित्त । राहे हें निश्चित दीनानाथा ॥ ३ ॥

१८

निद्रा आणि जागृतींत देवराया । श्वसनादि क्रीया चालवीसी ॥ १ ॥ रक्षावया नीट बुबुळाची स्थिति । कोण नेत्रपातीं हालवी

तो ॥ २ ॥ अन्नप्राशनादि क्रियेला सबळ। स्नायू अनुकूल कोंवि होती ॥ ३ ॥ पाचनादि क्रीया कोण करी रस । पोंचवी अंगास रक्त कोण ॥ ४ ॥ कोण या देहासी कैसा सांवरीतो । कोण चेष्टविती अवयवां ॥ ५ ॥ सहज संस्कार इच्छा आणि शक्ति । कैसी देती गति शरीरासी ॥ ६॥ पाहतों ऐकतों बोलतों चालतों । कल्पना करीतों नेणों कैसे ॥७॥ कैसें ज्ञान मन जीव काय आहे । कोणीकडे राहे कैशापरी ॥ ८ ॥ सर्वत्र ही तुझी सत्ता सदोदीत । नेणों आह्मीं तींत कैसे आहों ॥ ९ ॥

१०

तारीं देवराया तारीं या अनाथा। तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ १ ॥ सकल जनाचा तूंची एक त्राता । तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ २ ॥ सकल सुखांचा तूंचि एक दाता । तूझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ३ ॥ सकल पापांचा तूंचि एक शास्ता । तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ४ ॥ पाप निर्दालना करीं शुद्ध चित्ता । तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ५ ॥ पापा म्यां त्यजावें नसे दूजी आस्था । तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥ ६ ॥ अभिलाषींना मी पराचिया वित्ता । तुझे पायीं माथा ठेवी दीन ॥७॥ अखिल ब्रह्मांडीं तुझी एक सत्ता । तुझे पायीं माथा ठेवी

दीन ॥ ८ ॥ सज्जन शिणले गुण तुझे गातां । तरी पायीं माथा ठेवी दीन ॥ ९ ॥ कृपेनें करीशि पावन पतितां । तरी पायीं माथा ठेवी दीन ॥ १० ॥

२०

परम जनका देवा विश्वपति । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥१॥ तुझ्या नियमांत सुखदुःख गति । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ २ ॥ नियमांच्या आज्ञा तुझ्या गूढ अति । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ३ ॥ स्पष्ट आज्ञा त्याहि चित्तीं न वागती । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ४ ॥ क्षमा करीं प्रभू धरीं आह्मां हातीं । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ५ ॥ दाखवीं सुपथ देईंना सुमति । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ६ ॥ देई क्षमा शांति उत्तम संगति । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ७ ॥ नासूनि विपत्ति दूर करीं खंती । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ८ ॥ तुजवीण कोण निवारील भीती । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ९ ॥ दयाघना लावीं तुझ्या पदीं प्रीति । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ १० ॥ भाकितों करुणा येतों काकुळती । बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ ११ ॥ तुझे भजनीं सुख वाटो हे विनंती॥ बाळकें नेणतीं आह्मीं तुझीं ॥ १२ ॥

२१

दुर्लभ ही संधि आनंदांत लोटूं । मग कोठें भेटूं परस्परां ॥१॥ आतांच या प्रीति बंधूजना वाहूं ॥ मग कोठें पाहूं एकामेकां ॥२॥ एथेंच स्नेहानें वागूं सर्वजण । मग कोणा कोण ओळखील ॥३॥ आयुष्य हें जात आहे मोठ्या वेगें । नका भरूं रागें थोड्यासाठीं ॥ ४ ॥

२२

आलीया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूं नये ॥१॥ तोची कृपानिधि वारील सांकडें । येर ते बापुडे काय रंक॥२॥ भवाचीये पाठीं दुःखाचीये राशी । शरण देवासी जातां भलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जया भार घातलीया । उपेक्षीना तया दीन-बंधु ॥ ४ ॥

२३

कां रे नाठवीसी कृपाळू देवासी । पोशीतो जगासी एकलाची ॥१॥ फुटे तरूवर उष्णकाळ मासीं। जीवन तयासी कोण घाली ॥ २ ॥ बाळा दुग्ध कोणी केलेंसे उत्पत्ती । वाढवी श्रीपति सवें दोन्ही ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचें नांव विश्वंभर । करा निरंतर ध्यान त्याचें ॥ ४ ॥

२४

धन्य तेचि प्राणी क्षमा ज्यांचे अंगीं। न भंगे प्रसंगीं धैर्यबळ ॥१॥ न ह्मणे कोणासी उत्तम वाईट। महत्व वरिष्ट नसे जेथें ॥२॥ अंतरीं सबाह्य सारिखे निर्मळ। हृदय कोमळ गंगारूप ॥ ३॥ तुका ह्मणे काया कुरवंडीन तयां। ठेवीन मी पायां मस्तक हें॥४॥

२५

या गाऊं आमच्या सदा मंगळासी। जगदाधारासी प्रेमभरें ॥ १ ॥ आनंदें आठवूं चिंतूं घडीघडी। धरूनि आवडी हृदयांत ॥ २ ॥ अंतर्बाह्य त्याची पूर्ण सत्ता न्यहाळूं। ओळखूं कनवाळू मायबाप ॥ ३॥ सर्व मनोभाव करूनि एकेठाईं। अर्पूं त्याच्या पायीं तनु मन ॥ ४ ॥ सद्गुण सद्भाव प्रीतिरंगें रंगूं। उल्हासें आलिंगूं आत्माराम ॥ ५ ॥

२६

शांतिसौख्य आहे अंतरीं जयाला। धन द्रव्य त्याला काय होय ॥ १ ॥ काय होय त्याला सुख नाशवंत। सखा भगवंत सौख्य ज्याचें ॥२॥ सौख्य ज्याचें आहे विषयांचे ठायीं। तोचि देवापायीं रत नोहे ॥ ३ ॥ रत त्याचे पायीं कैसा तो होईल। मन जो वाहील अन्य देवां ॥४॥ अन्य देव नाहीं सत्य हेंचि जाणा। जगताचा राणा तोचि एक ॥ ५ ॥

२७

नोळखे कदा जो आपुलिया पित्या । सार्थक तें जीत्या काय त्याचें ॥१॥ काय त्याचें जगीं अखिल तें जिणें । प्रभुवराविणें शून्य जाणा ॥२॥ शून्य जाणा साचि त्यातें दशदिशा । नाणी जगदीशा मनीं जो कां ॥ ३ ॥ प्रेमा जगदीशाठायीं आहे ज्याचा । तोचि संत साचा जगामाजी ॥ ४ ॥ जगामाजि सत्यशील जो तो साधु । येर सर्व भोंदु कृत्रिमी ते ॥ ५ ॥

## श्लोक.

अनुष्टुप्.

१

विश्वेश्वर नमस्तुभ्यं विश्वात्मा विश्वकर्मकृत् । विश्वभुग्विश्वमायुस्त्वं विश्वक्रीडारातिप्रभुः ॥ १ ॥ नमः शान्तात्मने तुभ्यं नमो गुह्यतमाय च । अचिन्त्यायाप्रमेयाय अनादिनिधनाय च ॥ २ ॥

कामदा.

२

विश्वनिर्मित्या विश्वपालका । भेट तूझिया देइं बालका ॥ काम क्रोध हे गांजिती अरी । भेट देउनी संकटा हरीं ॥ १ ॥ दीनवत्सला तूझियाविणें । व्यर्थ व्यर्थ हें व्यर्थरे जिणें ॥ सत्यरूप तूं हे परात्परा । शुद्ध शांत तूं यातनाहरा ॥ २ ॥ असशि जो सदा व्यापुनी जगा । त्या तुला विभो केविं गाउं गा ॥ ज्ञान खाणि तूं हे जगत्पति । प्रार्थितों तुतें मूढ मी अति ॥३॥ विषयसौख्य हें याचितों न मी । चरणिं दीन मी तूझिये नमीं ॥ ह्मणुनि शीघ्र बा देइं दर्शना । तदनु होतसे शांति या मना ॥४॥ दीन मी तुझें दीन लेंकरूं । तूझियाविणें काय ग्रा करूं ॥ नाणि मी कधीं कांहि अंतरीं । मानसीं प्रभो तूजला धरीं ॥ ५ ॥

भुजंग प्रयात.

३

नमो देवराया नमो ज्ञानसिन्धो। नमो दीननाथा नमो दीनबन्धो ॥ नमो निर्मला निर्गुणा निर्विकारा। नमः सर्वशक्ते नमो हे उदारा ॥ १ ॥ नमो विश्वकर्त्या नमो विश्वपाळा। नमो मायबापा नृपाळा कृपाळा ॥ नमः सौख्यकंदा नमो विश्वभूपा। नमः सच्चिदानन्द शान्तिस्वरूपा ॥ २ ॥

४

अह्माला सुखानें भवाब्धी तराया। कृपेची तुझ्या नाव दे देवराया ॥ नसे भंगभीती अशी अन्य नाहीं। न ती प्राप्त होतां बुडावें जनाहीं ॥ १ ॥

पृथ्वी.

५

प्रभो प्रणतवत्सला बहुत पातकी दीन मी। निराश्रित अजाणता तुज सदैव चित्तीं नमीं ॥ चुकें तर पदोपदीं पण न भीं नसें घाबरा। क्षमाच करिशील तूं भरंवसा मला हा बरा ॥ १ ॥ अगाध महिमा तुझा बुधहि गावया नेणती। यथामति वदावया मजचि लाज ती कोणती ॥ पिईन परमेश्वरा विमल कीर्तिगानामृता। भिईन न कदापि मी मग पुढें जित्या वा मृता ॥२॥

असंख्य दिसती नभीं रुचिर गोल जे प्रत्यहीं । तुझें यश कथा-
वया उदित दैवतें सत्य हीं ॥ दिलीस गति ज्यांस जी सतत
तीच संभाळिती । सुबोध करण्यास त्यां स्वनियमां न जे पाळि-
ती ॥ ३ ॥

६

भवाब्धिपतिता मला प्रभु तुझी कृपानाव दे । दुजा सदय कोण
कीं मज न भीं असें जो वदे ॥ असें जड अनाथ मी तरि
सहाय हो तूं मला । कसा द्रव नये तुला प्रभु दयानिधे कोम-
ला ॥ १ ॥

७

प्रभो प्रणतवत्सला अधम पातकी दीन मी । नसे इतर तारि-
ता तुज सदैव चित्तीं नमीं॥ भवांबुधि तरावया विमल भाव लाभे
तरी । तरी हरिल आपदा भरंवसा असा अंतरीं ॥ १ ॥ दया-
मृतघना मला दुरितवन्हि हा ताप दे । करीं विपुल वृष्टितें
शमावें शीघ्र या आपदे ॥ अजाण शिशुच्या सहे बहुत माय
खोड्या परी । तदार्तिस्वर ऐकतां कळवळेच ती अंतरीं ॥ २ ॥
अतर्क्य महिमा तुझा सुकवि वर्णितां भागले । तथापि मतिहीन
मन्मनहि कीर्तनीं लागलें ॥ कृपा करुनियां प्रभो सकल
जाड्य माझें हरीं । वसें हृदयमंदिरीं स्वगुणगीतमाला वरीं॥३॥

पुराणपुरुषा विभो अखिल विश्वकारागिरा । अचिंत्य रचना गमे कथिल केंवि ही मद्गिरा ॥ पित्यास शिशुचे जसे मधुर बोबडे बोलही । तसी रुचिर मानुनी मम स्तुतीहि सेवाल ही ॥ ४ ॥

८

सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो । कलंक मतिचा झडो विषय सर्वथा नावडो ॥ सदंघ्रिकमळीं दडो मुरडितां हटानें अडो । वियोग घडतां रडो मन भवच्चरित्रीं जडो ॥ १ ॥
न निश्चय कधीं ढळो कुजनविघ्नबाधा टळो । न चित्त भजनीं चळो मति सदुक्तमार्गीं वळो ॥ स्वतत्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो । पुन्हा न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥२॥

शिखरिणी.

९

दयासिंधो देवा अनुपम तुझी होय करणी । न साधे कोणा ही रुचिर असली सृष्टि सरणी ॥ कशी केली नेणों अमितसुख भांडार धरणी । दिली वाटे आम्हा प्रभु तदुपभोगास वरणी॥ १॥
तुझ्या सामर्थ्याचें मनन करितां मान सरती । कळे गर्विष्ठांतें स्वधन बलसीमा न सरती ॥ तुझे पायीं देवा अनुदिन असो मानसरती । जशी कीं हंसांतें कविमत असे मानसरती ॥ २ ॥

समाप्त.

ठाणे.